# शिवतीर्थावरून..! भाग ४




*शिवतीर्थ - **निश्चयाचा महामेरू, बहुत जनांशी आधारु. अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी.** - समर्थ रामदास स्वामी.*

## आमच्या बालमोहन शाळेला माझी भेट


शिवाजी पार्कची बालमोहन विद्यामंदिर शाळा म्हटलं की, त्वरित आमचे आदरणीय शिक्षण महर्षी ती. दादासाहेब रेगे डोळ्यासमोर येतात. त्याचबरोबर उत्तम शिक्षक वर्ग, नियमित साजरे केले जाणारे सर्व सण, सहली, विद्यार्थी मित्र, कौतुक वगैरे वगैरे न विसरतां स्मरणात येतं. आणि महत्वाचं म्हणजे, शाळेच्या डाव्या कोपऱ्यात लँडमार्क असलेला प्रचंड पिंपळाचा वृक्ष..! म्हणतात, देवाचिये द्वारी । सोन्याचा पिंपळ । मनी सळसळ । चैतन्याची । आमच्या शाळेचा तो लँडमार्क पिंपळाचा वृक्ष दुर्दैवाने आज तो तेथे नाहीये.





***१) शिक्षणमहर्षी ती. दादा रेगे... २) ती. दादा, शाळेतील कांही शिक्षकवर्ग व विद्यार्थी यांनी दिल्लीत पंत प्रधान इंदिरा गांधी यांची घेतलेली भेट...***

*खाली: १) दिल्लीत राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्यासोबत ती. दादा... २) दिल्लीत राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट शिक्षकाचे पारितोषिक स्विकारतांना ती. दादा... ३) शिवाजी पार्कला शाळेतील विद्यार्थ्यांसमोर भाषण करतांना ती. दादा...*



आम्ही मुंबईत आलो ही वार्ता शिवाजीपार्कला वाऱ्यासारखी पसरली होती. माझा शाळकरी मित्र नवीन आंबुलकर व डॉ. मीना नेरुरकराचा नवरा डॉ. अनिल नेरुरकर हे त्याला कारणीभूत होते. तसं पाहिलं तर, शिवाजी पार्क जिमखाना हा पूर्वीचा जिमखाना राहिला नाहीये. तो आता Gossip Corner झाला आहे असं माझं स्पष्ट मत. क्रिकेटशिवाय तेथे सर्व कांही चालतंय. त्याची यादी मी देत नाही. परंतु, जुने-नवे मित्र एका ठिकाणी भेटण्याचा तो अड्डा मला फायदेशीर ठरला होता, तक्रार नाही. असो.

सध्या मराठी व इंग्रजी विषयात चालणारी बालमोहन शाळा, ती. दादांचा नातू व ती. बापू सरांचा मुलगा गुरुप्रसाद रेगे उत्तमपणे सांभाळतोय. एकदा अचानक मला गुरुप्रसादचा फोन आला. *"सर, मी बालमोहन शाळेतून गुरुप्रसाद बोलतोय. तुम्ही येथे आला आहात हे मला कळले. आज संध्याकाळी मी तुम्हाला तुमच्या घरी भेटायला येतोय. घरी असाल नां..?"*ठरल्याप्रमाणे गुरुप्रसाद आला, बूट काढून आम्हाला वाकून नमस्कार केला व म्हणाला, *"मी जास्त वेळ घेत नाही. उद्या सकाळी तुम्ही शाळेत ठीक ९ वाजतां ब्रेकफास्टला आलात तर मला खूप आनंद होईल. तेव्हा जरुर या. तसेच, तुमचा दुर्मिळ छायाचित्रांचा संग्रह पाहायला मी नंतर येईनच. सकाळी गाडी पाठवीन..." "अरे, गाडीबिडी पाठवू नकोस. आमच्या घरापासून दोन पावलांवर शाळा आहे. आम्ही चालत येऊ. काळजी नको..."* मी म्हणालो. माझ्यादृष्टीने ही अत्यंत आनंदाची बाब होती. आम्ही ते आमंत्रण स्विकारले व गुरूने निरोप घेतला. यापूर्वी मुंबईतील आमच्या प्रत्येक भेटीत मी अनेकदा शाळेत गेलोय. मात्र त्यावेळी ती. बापू व ती. बाळ सर होते. नंतर ती. बापूंची दोन्ही मुलं गिरीश व गुरुप्रसाद आणि कधीतरी ती. बाळ सरांचा मुलगा नंदन हा शाळेत भेटायचा. आज ती पूर्वीची परिस्थती व परंपरा शाळेत नाहीये याची मला जाणीव होती. आमचे ती. नाईक मास्तर हे माझे शिक्षक. परंतु, कालांतराने ते व त्यांच्या पत्नी ती. मंदाताई (त्याही आमच्या शाळेतील शिक्षिका होत्या) माझे चांगले परिचित नव्हे, स्नेही झाले होते. त्यामुळे नाईक सरांकडून मला शाळेचा सर्व इतिहास

अमेरिकेत बसून कळत होता. एक मात्र खरं की, ती. दादांच्या नंतर कांही प्रमाणात हा गुरुप्रसाद शाळा चांगली चालवतोय. आज मुंबईतील मराठी शाळा बंद पडतायत. परंतु, बालमोहनच्या मराठी व इंग्रजी माध्यमातील दोन्ही शाळा उत्तम प्रगती पथावर आहेत. ही अभिनंदनीय व जमेची बाजू होय.






***१) जुन्या पत्र्याच्या शाळेत १५ ऑगस्ट रोजी झेंडावंदन समारंभाच्यावेळी... २) जुनी विटांची शाळा... ३) शिवाजी पार्कसमोरील पहिली नर्सरी शाळा... ।***

*खाली:* ***१) ऑफिसमध्ये सदैव कामात मग्न असलेले ती. दादा... २) परीक्षेच्यावेळी एका वर्गात अचानक भेट देतांना ती. दादा... ३) प्रत्येक सहलीला हजर राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व स्थळांची माहिती देतांना ती. दादा...***





ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही शाळेत गुरुप्रसादला भेटायला गेलो. आमचं उत्तम स्वागत करून गुरूने वीणाला सोनचाफ्याने भरलेलं बास्केट भेट दिलं. आणि मला निरनिराळे संदेश-सुभाषिते असलेले बुक मार्क्स दिले. शाळेची प्रगती कशी उत्तम चाललीय याचा आढावा सांगितला. नंतर ब्रेकफास्टला कांदे पोहे, उपमा, बिस्किटे व चहा-कॉफी दिली. थोडयावेळाने शाळेच्या दोन्ही माध्यमातील प्रमुख शिक्षिकांना बोलावून आमची भेटवजा ओळख करून दिली. हा सोहळा औचित्यपूर्व व संस्मरणीय होता. एक दिवस शाळेतील दोन्ही माध्यमातील मुलांपुढे मी दोन शब्द बोलावेत, माझे अनुभव सांगावेत व मार्गदर्शन करावे असा गुरूने मला सल्ला दिला. वेळ मिळाला तर मी विचार करून सांगीन. नाहीतर पुढील वर्षी निश्चित तयारी करून येईन असे मोघमपणे सांगून तो विषय टाळला. एकंदरीत गुरूने आमचा पाहुणचार उत्तम घेतला होता. त्यानंर माझ्या दुर्मिळ संग्रहाच्या खजिन्यातील गुरुला मी एक खास भेट दिली. ती पाहून तो व त्या सर्व शिक्षिका चकित झाल्या. ती भेट होती, माझ्याकडील १९५५ मधील जपलेलं शाळेतील त्या पिंपळाचं भलं मोठं जाळीदार पान. गुरूच्या डोळयात पाणी आलं. सोन्यापेक्षाही मौल्यवान

अशी ती भेट होती. त्यासोबत शाळेसंबंधित मी लिहिलेले व नवशक्तीत प्रकाशित झालेले दोन शब्दांची जोड होती. शाळेच्या इतिहासात जोपासून ठेवणारा ते दुर्मिळ पिंपळाचं पान व शाळेला ते भेट देणारा मी एकमेव विद्यार्थी होतो याचा अभिमान सर्वांना वाटला. मंडळी, याशिवाय माझ्याकडे ती. बापू व ती. बाळ सरांनी दिलेले शाळेचे अतिशय दुर्मिळ जुने फोटोही आहेत. १५ जानेवारी, १९६३ रोजी 'बालदिना' निमित्त शिवाजी पार्कात झालेलं आचार्य अत्रे यांचे भाषण. तसेच, शाळेतील गायनाचे मास्तर वि. दा. जोगळेकर यांच्या प्रार्थनांचे दुर्मिळ रेकॉर्डिंग बऱ्याच वर्षयांपूर्वी मला भाऊ मराठेने दिले होते. (आज भाऊ आमच्यात नाही याचे दुःख होत आहे. तसं पाहिलं तर माझ्या १९६५ बॅचचे दहा विद्यार्थी मित्र हयात नाहीत. अशा कांही दुःखद आठवणींनी मन बेचैन होतं.) तेही मी गुरूला पुढील आठवड्यात भेट म्हणून पाठविणार आहे. आश्चर्य म्हणजे, हे सर्व गुरुकडे अथवा शाळेत नाहीये. मात्र, अत्यंत दुर्मिळ फोटो त्याला नुकतेच मिळाले आहेत ते त्यानी मला दाखवले. आणि कधीही न पाहिलेले ते फोटो पाहून मी चकित झालो होतो. अर्थात तो क्षण आनंदाचाच होता. निरोप घेतांना गुरु म्हणाला, *"सर, तुम्ही काळजी करूं नका. मी ते तुम्हाला स्कॅन करून नक्की पाठवीन. याची खात्री बाळगा..."*






***१) शाळेचे कार्यकारी मंडळ. बसलेल्या: १) ती. कामत बाई, ती. कुसुमताई नाडकर्णी बाई व ती. भानुमती नाडकर्णी बाई. उभे: ती. आठल्ये सर, ती. दादा, ती. सोहोनी सर व ती. बापू सर... २) तळेगांव येथील ती. रामभाऊ परुळेकर विद्यानिकेत शाळेसमोर ती. दादा व ती. बाळसर... ३) डॉ. राऊत रोडवरील शाळेची नवी इमारत...***


*खाली:* ***१) परवाच्या भेटीत आठवणवजा गुरुप्रसादला दिलेले १९५५ मधील माझ्या संग्रहातील दुर्मिळ पिंपळाचे जाळीदार पान... २) शाळेच्या डाव्या बाजूला असलेला प्रचंड पिंपळ वृक्ष... ३) १९६३ मधील शाळेचे शिक्षक: ती. नाईक सर, ती. इनामदार सर आणि ती. बाळ सर...***



बालमोहनचं शाळेत गेल्यावर नवं वातावरण पूर्वीसारखंच शिस्तीत आहे. परंतु, आता प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गळयात त्याच्या Indentification चा दाखल असतो. तसेच, शाळेत कुणालाही सहजासहजी प्रवेश मिळणं सध्या फारच कठीण आहे. हे विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचं असून एका  दृष्टीने चांगलं लक्षण आहे. तसेच, इंग्रजी माध्यमाची वेळ सकाळी व मराठीची दुपारी असते. परंतु, चेहरे नवीन आहेत. इंग्रजी शाळेचा युनिफॉर्म वेगळ्या रंगाचा आहे. बरेच विद्यार्थी आपल्या पालकांबरोबर स्कूटर अथवा गाडीतून येतात. हा बदल जाणवला. थोडक्यात, सेक्युरिटी खूप कडक असल्याने बऱ्याच माजी विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश मिळत नाही अशा तक्रारी करणारेही मला पुष्कळ भेटले. आमच्या  वेळेला शाळेच्या कँटीनमध्ये दोन पावात बटाट्याची भाजी असलेला चविष्ट 'चाऊ-माऊ' मात्र मिळत नाही. माझ्या धांवपळीत यावेळी माझी नाईक सरांची भेट झाली नाही. पण फोनवर प्रदीर्घ बोलणं झालं. आज ते ८४ वर्ष्यांचे आहेत.म्हणाले, *"जयंतराव, आपली भेट झाली असती तर मला खूप आनंद झाला असतां. माझ्यासोबतचे शाळेत काम करणारे एकही शिक्षक आता हयात नाही हो. पुढील वेळी मुंबईत आलात तर मी असेन याची खात्री नाही. मात्र, नेहमीप्रमाणे फोन करीत जा..."* हे सांगतांना नाईक सर चक्क रडत होते. मी नाईकसरांना म्हटलं अहो, *"तुमच्याआधीच्या ९६ वय वर्ष असलेल्या आमच्या (दुसरीला शिकविणाऱ्या बाई) ती. इंदुताई नाडकर्णी आहेत की. त्या आमच्या गल्लीतच (डॉ. राऊत रोडवर) मुलं-नातवंडांकडे आनंदात रहात आहेत..."* त्यांचे पती तीन वर्ष्यांपूर्वी जेव्हा त्यांचा १०० वा वाढदिवस साजरा झाला त्यानंतर कांही महिन्यातच स्वर्गवासी झाले होते. या वेळी मला रामकृष्ण भेटला नाही जो माझ्या मुंबईच्या भेटीत हमखास भेटत असे. हॉटेलमद्ये मला घेऊन चहा-नास्ता देत असे. चौकशी केल्यावर कळले की, तो गेल्यावर्षी स्वर्गवासी झाला.

***१) गेल्यावर्षी ९४ वर्ष्याच्या ती. इंदुताई नाडकर्णी बाई यांची झालेली भेट... २) पूर्वी ती. बापू सरांची झालेली भेट... ३) गेल्या वर्षी ती. नाईक सर व ती. मंदाताई यांच्या लग्नाच्या ६०व्या वाढदिवसाच्या समारंभात मी व वीणा...*** खाली: ***१) १९३९ साली जेथे ती. दादा रहात होते (शिवाजी पार्कला जेथे नर्सरी शाळा सुरु झाली तेथे) ती. दादांनी एका विद्यार्थ्याला घेऊन शाळा सुरु केली होती. ते पहिले एकमेव विद्यार्थी कै. कर्नल गुरुनाथ नाडकर्णी. जे आम्हला अमेरिकेत न्यू जर्सीत भेटले होते... २) मराठी व इंगजी माध्यम शाळेचा मुख्याधापक ती. बापू सरांचा मुलगा गुरुप्रसाद रेगे (जो सहा फूट चार इंच उंच आहे) मी मुंबईत आलो आहे हे कळल्यावर त्वरित आम्हाला खास घरी भेटायला आणि दुसऱ्या दिवशी शाळेत ब्रेकफास्टचे आमंत्रण करायला आला होता, त्यावेळी गुरुप्रसाद व मी... ३) दुसऱ्या दिवशी शाळेत भेटायला गेल्यावर सौ. वीणाला भेट म्हणून सोनचाफ्यांच्या फुलांची बास्केट व मला इतर भेटवस्तू दिल्यावर दोन्ही माध्यमातील प्रमुख शिक्षकांची भेटवजा ओळख करून दिली तेव्हा...***

आम्ही बालमोहन शाळेजवळच राहात होतो. आजही ती जागा आहे. मात्र, शिवाजी पार्कचा परिसर खुप बदलला आहे. गर्दी व रहदारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. तरीही सर्व आनंदात आहेत. प्रत्येकाची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. यात वाद नाही. नवं युग व नवी पिढी नव्या वातावरणात जुने संस्कार विसरू लागले आहेत. हा फरक प्रकर्षाने जाणवला. पण, आता दुःख करून कांहीही उपयोग नाही. ते संस्कार आपल्याबरोबरच नाहींसे होणार आहेत, त्यावेळी आपण हयात नसणार हे सुदैवच म्हणायचे... असो.





***माझ्या १९६५ बॅचचे कांही मित्र-मैत्रिणी यांची शिवाजी पार्कला झालेली भेट: १) मीना नेरुरकर व मी... २) जिप्सी या चायनीज रेस्टॉरंट मध्ये. डावीकडून: भांडारकर, मंगला देऊळकर व नाडकर्णी. उजवीकडे: मी, विजया चौधरी जी नंतर बालमोहन शाळेची मुख्याध्यपिका होती, वसुमती भातखंडे व नेरुरकर... ३) पार्कात भेटलेले शाळेचे काशिनाथ मासुरकर व त्याची पत्नी जी माझी क्लासमेट होती ती गीता गोळीकेरी व मी...*** *खाली:* ***१) मी मुंबईत आलो आहे हे कळल्यावर खास भेटायला आलेला वर्गमित्र माणिक गेहानी. ज्यानी आम्हाला पार्क क्लबमध्ये डिनरला नेले होते तेव्हा... २) तसेच, त्वरित घरी भेटायला आलेला वर्ग मित्र सुधीर हडकर व नवीन आंबुलकर... ३) अचानक रस्त्यात भेलेला वर्ग मित्र अनिल कर्णिक व ती. दादांचा धाकटा मुलगा महेश रेगे...***





**(क्रमशः)**

**- जयंत कुळकर्णी**